पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई सुधारित आकृतीबंधानुसार बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घ्यावयाच्या कार्यक्रम अधिकारी-२, व्यवस्थापक (नाट्यगृहे)-२, बहुविध सहायक-४, वाहन चालक-१ अशा एकूण ०९ मनुष्यबळांच्या वेतनाकरिता निधी खर्च करण्यास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्र.पुलदे-२०२४/प्र.क्र.५८(ई-६२८२२५)/सां.का.२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ०१ सप्टेंबर, २०२६

वाचा : १) पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय, क्र.पुलदे-२०२४/ प्र.क्र.५८ (ई.न.६२८२२५)/सां.का.२, दि.२६.०५.२०२६

२) संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांचे क्र.पुलदे/आस्था/ प्र.क्र.१३/२०२६/बाह्ययंत्रणा ई-निविदा/जा.क्र.१०१७, दि.०४.०८.२०२६ रोजीचे पत्र.

प्रस्तावना :-

या विभागाच्या अधिनस्त असणात्या पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या आस्थापनेवरील बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घ्यावयाच्या कार्यक्रम अधिकारी-०२, व्यवस्थापक (नाट्यगृहे)-०२, बहुविध सहायक-०४ व वाहन चालक-०१ अशा ०९ मनुष्यबळांच्या सेवा, ०१ जुलै, २०२६ ते ३१ मे, २०२७ या ११ महिन्याच्या कालावधीकरिता, बाह्यस्त्रोत पध्दतीने उपलब्ध करुन घेण्यास व त्यासाठी होणाऱ्या रु. ४२,८०,०३२/- (अक्षरी रुपये बेचाळीस लक्ष ऐंशी हजार बत्तीस फक्त) इतक्या खर्चास संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

सदर सुधारीत आकृतिबंधानुसार पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई येथे बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घ्यावयाच्या ०९ मनुष्यबळांच्या सेवा ११ महिन्यांच्या कालावधीकरिता उपलब्ध करुन घेण्याकरिता होणाऱ्या खर्चास वित्तीय मान्यता देण्याची विनंती संचालक,पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी यांनी संदर्भाधिन क्र.२ अन्वये केली आहे.

त्यानुसार पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीच्या आस्थापनेवरील बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घ्यावयाच्या कार्यक्रम अधिकारी-२, व्यवस्थापक (नाट्यगृहे)-२, बहुविध सहायक-४, वाहन चालक-१ अशा ०९ मनुष्यबळांच्या सेवा, ११ महिन्यांच्या कालावधीकरीता बाह्ययंत्रणेमार्फत उपलब्ध करुन घेण्यासाठी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णयः-

पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांच्या आस्थापनेवरील बाह्ययंत्रणेव्दारे उपलब्ध करुन घ्यावयाच्या कार्यक्रम अधिकारी-२, व्यवस्थापक (नाट्यगृहे)-२ बहुविध सहायक-४, वाहन चालक-१ अशा ०९ मनुष्यबळांच्या वेतनाकरिता रु. २१,३७,९३८/- (अक्षरी रुपये एकवीस लक्ष सदतीस हजार नऊशे अडतीस फक्त) इतका निधी खर्च करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

२. यािप्रत्यर्थ होणारा खर्च पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमीचे मुख्यलेखाशीर्ष “मागणी क्र. झेडडी-२, २२०५ कला व संस्कृति (००) (१०१), ललित कला शिक्षण (०७) कला अकादमी (०७) (०१) पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी,मुंबई (अनिवार्य) (२२०५१४६३) १०-कंत्राटी सेवा” या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. याबाबतचा खर्च भागविण्यासाठी, त्या-त्या आर्थिक वर्षात निधीची तरतूद करण्याची जबाबदारी, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई, यांची राहील.

३. संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांना यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून, त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास या संबधीच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

४. श्री. संत गाडगेबाबा महाराज बेरोजगार संस्था, भांडूप, मुंबई या संस्थेने सर्व रकमांचे प्रदान संबंधितांना केले आहे किंवा कसे, तसेच त्यातून सर्व वैधानिक कपाती (उदा. कर्मचारी भविष्य निर्वाह निधी, कर्मचारी राज्य विमा, व्यवसाय कर, आयकर, महाराष्ट्र कामगार कल्याण निधी इ.) केल्या आहेत किंवा कसे, हे तपासण्याची, तसेच यासंबधी वित्त विभाग व ऊद्योग, ऊर्जा व कामगार विभागाचे वेळोवेळी निर्गमित केलेल्या निधी वितरणाबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्याची जबाबदारी संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांची राहील. तसेच बाह्यस्त्रोत कर्मचाऱ्यांना पुरवठादारामार्फत प्राप्त होणारे वेतन यथायोग्य दरमहा मिळत असल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांची राहील.

५.	याबाबतच्या कामाची पूर्तता झाल्यानंतर खर्चाचे देयके, संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई यांनी शासनास सादर करावे.

६.	सदर शासन निर्णय, वित्त विभाग, विअप्र -२०२६/प्र.क्र.२२/विनियम, दिनांक ११ ऑगस्ट, २०२६, वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग-पहिला, उपविभाग-चार, अ.क्र.१० अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७.	सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०२६०९०११६४७०८१८४३ असा आहे. हा आदेश डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

NANDA MARUTI RAUT

Digitally signed by NANDA MARUTI RAUT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Tourism and Cultural Affairs,
2.5.4.20=1983A6357BDEA5C5091136D73EC0B1D7D99AF67DF3CCA676C00FAD04572B4AA9, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=BAF9D9317025580944685E047B9C52D64C532684054F19E1F02C374B78E1773F, cn=NANDA MARUTI RAUT
Date: 2026.09.01 16:49:11 +05'30'

(नंदा राऊत)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. १.महालेखापाल लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता महाराष्ट्र-१, मुंबई
२. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
४. मा. मंत्री, सांस्कृतिक कार्य यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. सचिव (सांस्कृतिक कार्य) यांचे स्वीय सहायक, पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबई.
७. अवर सचिव/कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प), पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. निवडनस्ती, सां.का.२.